MHRG080000162013 नि.दि.दा.क्र.१०९/२०१३

श्री. काशिनाथ आंचन
वि.
श्री. दशरथ निकम वै.

# नियमित दावा क्रमांक १०९/२०१३ मधील निशाणी क्र. १०२ खालील आदेश

वादीने प्रस्तुत अर्जाव्दारे दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ व आदेश १ नियम १० प्रमाणे दाव्यामध्ये पक्षकार सामाविष्ट करण्याची विनंती केली आहे.

**०२.** वादीचे असे कथन आहे की, त्याने प्रस्तुतचा दावा हक्क प्रस्थापनेकरिता आणि साठेकराराची विशेष पुर्तता करुन मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र. ३ रविद्र वसंत साळवी हा दावा दाखल करण्यापुर्वीच म्हणजेच दिनांक २६/०४/२०१३ रोजी मयत असल्याची माहिती वादीला फेरफार क्र. ९३९ काढल्यानंतर समजली. त्यामुळे त्याने प्रतिवादी क्र. ३ चे वारस प्रतिवादी म्हणुन दाव्यास पक्षकार करण्याची विनंती केलेली आहे.

**०३.** त्याउलट, प्रतिवादी क्र. ४ तर्फे प्रस्तुत अर्जास हरकत नोंदविण्यात आलेली आहे. त्याने असे कथन केले आहे की, प्रस्तुतचा अर्ज दावा दाखल झाल्यानंतर ७ वर्षाच्या कालावधीने दाखल करण्यात आलेला आहे. तो एवढ्या विलंबाने का दाखल करण्यात आला याचे कारण दिलेले नसल्यामुळे प्रतिवादी क्र. ४ ने तो नामंजुर करण्याची विनंती केली.

**०४.** प्रकरणाचे अवलोकन केले असता, प्रस्तुतचा दावा हक्कप्रस्थापनेकरिता व कराराची विशेष पुर्तता करुन मिळण्याकरिता दाखल केलेला आहे. वादीने प्रस्तुत अर्जाद्वारे मयत प्रतिवादी क्र. ३ चे कायदेशीर प्रतिनिधी दाव्यात पक्षकार म्हणुन सामाविष्ट करण्याची विनंती केलेली आहे. अभिलेखाचे अवलोकन केले असता, वादीतर्फे दावा मिळकती संदर्भातील फेरफार क्र. ९३९ ची प्रत दाखल करण्यात आलेली आहे. त्यामध्ये प्रतिवादी क्र. ३ हा मयत असल्याचे नमुद करुन त्याचे कायदेशीर प्रतिनिधींची नावे मिळकतीच्या अधिकार अभिलेखात नमुद करण्यात आलेली आहेत. त्यावरुन प्रतिवादी क्र. ३ हा दावा दाखल करण्यापुर्वीच म्हणजेच दिनांक २६/०४/२०१३ रोजी मयत झाल्याचे निदर्शनास येत आहे.

**०५.** प्रतिवादी क्र. ३ हा दावा दाखल करण्यापुर्वीच मयत असल्यामुळे, वादीतर्फे दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८, चा आदेश २२ च्या तरतुदीप्रमाणे अर्ज दाखल न करता आदेश १ नियम १० खाली प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यात आलेला आहे. प्रतिवादी दावापुर्व मयत असल्यामुळे, आदेश २२ च्या तरतुदी लागु होत नाहीत. परंतु, आदेश १ नियम १० च्या तरतुदीप्रमाणे आवश्यक पक्षकारांना दाव्यामध्ये सामाविष्ट करता येऊ शकते. प्रतिवादी क्र. ३ च्या मृत्युनंतर दावा मिळकतीमध्ये त्याचे कायदेशीर प्रतिनिधी यांचा वारसा हक्क निर्माण झाल्यामुळे, ते दाव्यास आवश्यक पक्षकार असल्याचे दिसत आहे. त्यामुळे दाव्यातील वाद प्रश्नांचा निर्णय करण्यासाठी त्यांची उपस्थिती आवश्यक आहे.

**०६.** वादीला, प्रतिवादी क्र.३ मयत असल्याची माहिती कधी झाली, माहिती झाल्यानंतर त्याने किती दिवसांमध्ये अर्ज दाखल केला याबाबतचा कोणताही उहापोह अर्जामध्ये केलेला नाही. दावा दाखल झाल्यानंतर ७ वर्षाच्या प्रदिर्घ कालावधीनंतर प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यात आलेला आहे. झालेल्या विलंबाबाबत कोणतेही समाधानकारक स्पष्टीकरण अर्जामध्ये नमुद केलेले नाही. परंतु वादीच्या निष्काळजीपणामुळे अर्ज नामंजुर करणे न्यायोचित होणार नाही. अर्ज खर्चासह मंजुर करुन, प्रतिवादींना खर्चाची रक्कम देणे उचित होणार आहे. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे:-

**–:आदेश:–**

| | |
|---|---|
| **०१.** | अर्ज (निशाणी क्र. १०२) रक्कम रुपये २,०००/-च्या खर्चासह मंजुर करण्यात येतो. खर्चाची रक्कम प्रतिवादींना देण्यात यावी. |
| **०२.** | खर्चाची रक्कम जमा केल्यानंतर, वादीने प्रस्तावित प्रतिवादी यांना दाव्यामध्ये प्रतिवादी क्र. ३/१ ते ३/५ म्हणून सामाविष्ट करुन घ्यावे व त्याअनुषंगाने दुरुस्ती १४ दिवसांच्या आतमध्ये करावी आणि दावा दुरुस्तीच्या प्रती दाखल कराव्यात. |

**(खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला )**

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by PRADIP MADAN MANE
Date: 2022.11.14 18:13:09 +0530

दिनांकः १४/११/२०२२ **(पी.एम.माने)**
खालापुर. सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, खालापुर.